# ॥ औदुंबर ॥

बालकवी त्र्य. ठोंबरे

ऐल तटावर पैल तटावर हिरवाळी घेउन ।
निळा सांवळा झरा वाहतो बेटाबेटांतुन ॥
चार घरांचे गांव चिमुकलें पैल टेकडीकडे ।
शेत मळ्यांची दाट लागली हिरवी गादी पुढे ॥१ ॥

पायवाट पांढरी तयांतुन अडवीतिडवी पडे ।
हिरव्या कुरणांमधुन चालली काळ्या डोहाकडे ॥
झांकळुनी जळ गोड काळिमा पसरी लाटांवर ।
पाय टाकुनी जळांत बसला असला औदुंबर ॥२ ॥

This is a portrait of a country region, through a poet's eyeview, involving a bluish-gray stream ( झरा), farms ( शेत), a small village in the background, greenery( हिरवाळी), praire( कुरण), a whitish ( पांढरा)foot path( पायवाट), and finally a tree called auduMbara -( वट वृक्ष)which is on the bank of the river/lake, with its roots dipping in the water, as if resting/enjoying by immersing its feet in the water.